# डॉ. सचिन मंगला यांची के. के. वाघ संस्थेला भेट

**नाशिक :** हरियाना राज्यातील ओ. पी. जिंदाल विद्यापीठाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन कुमार मंगला यांनी नुकतीच के. के. वाघ शिक्षण संस्थेला भेट दिली. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांच्या हस्ते सत्कार पार पडला. प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. रुचिता गायधनी यांनी पाहुण्यांचा परिचय केला. डॉ. सचिन कुमार मंगला हे म्हणाले, की नवसंशोधकांसाठी संशोधन प्रक्रियेतील टप्पे आहेत. उच्च दर्जाच्या जर्नल्समध्ये संशोधन प्रकाशित करण्यासाठी आवश्यक निकष तसेच उत्तम संशोधनासाठी आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्था व औद्योगिक संस्था यांच्या सहकार्याने समाजातील विविध समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत मार्गदर्शन केले. यशस्वितेसाठी संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के. एस बंदी, प्राचार्य डॉ. नांदुरकर यांनी मार्गदर्शन केले.